जा.क्रं. नावाशमनपा/नसका/सिआर-12,13/2018
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
दिनांक :- 06.08.2018

# <u>सभेची सुचना</u>

मा. सभापती, स्थायी समिती नावाशमनपा नांदेड यांचे पत्र दिनांक 06.08.2018 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची नियमीत स्थायी समितीची सभा दिनांक 08.08.2018 रोजी सकाळी 11.00 वाजता आयोजीत करण्यात आलेली असुन सदरील सभेचे कामकाज संपल्या बरोबर लगेचच त्याच ठिकाणी दिनांक 04.08.2018 रोजीची पुढे ढकलण्यात आलेली मनपा स्थायी समितीची सभा घेण्यात यावी असे लेखी कळविलेले आहे.

त्यानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची नियमीत स्थायी समितीची सभा दिनांक 08.08.2018 रोजी सकाळी 11.00 वाजाता घेण्यात येणार असुन सदरील सभेचे कामकाज संपल्या बरोबर लगेचच त्याच ठिकाणी दिनांक 04.08.2018 रोजीची पुढे ढकलण्यात आलेली मनपा स्थायी समितीची सभा घेण्यात येणार आहे.

करिता सर्व स. सदस्य/सदस्या यांनी उक्त दोन्ही स्थायी समितीच्या सभेस उपस्थित राहुन सहकार्य करावे ही विनंती.

**(मा. सभापती स्थायी समिती यांच्या आदेशान्वये)**

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

जा.क्र./नसका/स्थायी/सिआर- 13/2018.
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांकः- 06.08.2018

**<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.</u>**

**<u>स्थायी समितीच्या सभेची सूचना</u>**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड चे प्रकरण-2 मधील नियम क्र. 3 (अ) अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूचि ड चे प्रकरण दोन मधील नियम क्र 3 (अ) (ब) अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा **<u>दिनांक 08.08.2018 रोजी सकाळी 11.00</u>** वाजता नांवाशमनपा स्थायी समिती सभागृह येथे भरविण्यात येत आहे तरी या सभेस उपस्थित राहावे ही विनंती.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगसचिव** | **सभापती** |
| **नावाशमनपा नांदेड** | **स्थायी समिती** |
| | **नावाशमनपा नांदेड** |

प्रति,
**श्री/श्रीमती** ______________________
सदस्य / सदस्या, स्थायी समिती,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**विषय क्रं. 01**

**विषय:-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत महात्माफुले व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांचे पूतळा परिसरात प्रसंगशिल्प पुरवठा करुन बसविणे बाबत

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत महात्माफुले व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांचे पूतळा परिसरात प्रसंगशिल्प पुरवठा करुन बसविणेसाठी ई-दरपत्रक सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/4497/2018 दिनांक 26.06.2018 अन्वये दैनिक मराठवाडा नेता / दैनिक नांदेड वार्ता या वृत्तपत्रात दिनांक 07.04.2018 रोजी दरपत्रक मागविले असता एकूण 03 दरपत्रक प्राप्त झाले प्राप्त दरपत्रक त्रिसदस्यीय समिती समोर दिनांक 19.07.2018 रोजी उघडण्यात आले सता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | दरपत्रक धारकांचे नांव | कामाचे विवरण | दिलेले दर प्रती चौरस मी. |
|---|---|---|---|
| 01 | देवरे अन्ड असोसिएटस औरंगाबाद | महात्माफुले व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांचे पूतळा परिसरात प्रसंगशिलप पुरवठा करुन बसविणे बाबत | 47,635/- |
| 02 | मे. सुंदर कन्सट्रक्शन नांदेड | महात्माफुले व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांचे पूतळा परिसरात प्रसंगशिलप पुरवठा करुन बसविणे बाबत | 53,300/- |
| 03 | शेख रियाज इजाज औरंगाबाद | महात्माफुले व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांचे पूतळा परिसरात प्रसंगशिलप पुरवठा करुन बसविणे बाबत | 53,700/- |

दराच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दर **देवरे अन्ड असोसिएटस औरंगाबाद** यांचे असून जे प्रति चौ. मी. रुपये 47,635/- इतके आहेत सदरचे दर जास्त वाटत असल्याने संबंधीतास दर कमी करण्यासाठी वाघाटी करिता पाचारण केले असता संबंधीतांनी दिनांक 03.08.2018 रोजी लेखी पत्र देवुन सदरचे दर प्रति चौ.मी. रुपये 47,635/- ऐवजी 500/- कमी करुन प्रति चौ.मी. 47,135/- या दराने करण्याचे लेखी समंती दिल्यानुसार सदर कामासाठी **देवरे अन्ड असोसिएटस औरंगाबाद यांचे वाटाघाटी अंती प्रति चौ.मी. 47,135/- दर मंजुरीस्तव तसेच यावर लागणारा खर्च रुपये 14,80,000/- यास प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव मनपा स्थायी समिती सभे समोर सादर.**

**विषय क्रं. 02**

**विषय :-** **<u>छत्रपती शाहु महाराज यांच्या 12 फुटी पुतळयाची वाढीव रक्कम शिल्पकारास देण्यास मान्यता देणे बाबत</u>**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत शासकीय कृषी विद्यालय नांदेड येथील मोकळया जागेवर छत्रपती राजर्षी शाहु महाराज यांचा पुतळा उभारणे बाबतचे काम **मे. सावंत आर्ट स्टूडीओ, मुंबई** यांना देण्यात आलेला आहे. संबंधीतास दिलेले आदेश व करारनामा अटी शर्ती प्रमाणे एकूण 31 लख रुपया पैकी 40% अंग्रिम व पुतळयास कला संचनालयाची मान्यता मिळाल्यानंतर

30% + 20% (स्थायी समिती, नावाशमनपा ठराव क्रं. 45 दिनांक 29.05.2017 अन्वये अदा) अशी एकूण 90% रक्कम संबंधीतांना अदा करण्यात आलेली आहे.

संबंधीत शिल्पकार हे पुतळा ठेवण्याचा किराया (14,40,000/-) दोन वॉचमन (7,020,000/-) वाढलेले मटेरीयल व मजलुरी (6020,000/-) इत्यादी बाबींवर होणारा वाढीव 27,80,000/- रुपयांची मागणी करत आहेत यामुळे वाढीव रक्कम अदा करण्यासाठी केलेल्या पाठपुराव्यानुसार योग्यतो निर्णय घेणे आवश्यक होते.

उपरोक्त मागणीच्या आधारे संबंधीतांच्या कामाचा कालावधी दिनांक 06.11.2012 ते 06.11.2013 असा एका वर्षाचा धरल्यास एकूण 04 वर्षाचा कालावधी उशीर झालेला आहे. एकूण चार वर्षाचा कालावधीतील फक्त पुतळा ठेवण्याचा किराया (14,40,000/-) व दोन वॉचमेन (7,20,000/-) करीता एकूण रुपये 21,60,000/- इतक्या रक्कमे ऐवजी रुपये 5,00,000/- ऐवढीव वाढीव रक्कम अदा करणे योग्य वाटते.

तरी उक्त 5,00,000/- रुपयांच्या वाढीव रक्कमेस मान्यता घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 03** **प्रस्ताव**

नांदेड शहरा मध्ये रिलायन्स कंपनीचे OFC केबल टाकण्याकरिता सर्वप्रथम 50 कि.मी. लांबीची परवानगी देण्यात आली होती त्यानंतर 10 कि.मी. लांबीची केबल टाकण्याकरिता परवानगी दिली असता पावसाळयाच्या दिवसात सदरची लाईन टाकू नये अशी मागणी शहरातील नागरीकांकडून करण्यात आल्यामुळे 10 कि.मी. लांबीचे काम थांबविण्यास सांगण्यात आले होते. तदनंतर 13 कि.मी. लांबीची लाईन टाकण्याकरिता परवानगीसाठी रिलायन्स कंपनी मार्फत महापालिकेस विनंती करण्यात आली आहे तसेच शहरामध्ये टी.व्ही. केबल जोडणी सुरु करण्यासाठी शहरातील पथदिव्यांच्या पोलवरुन केबल टाकण्यासाठी रिलायन्स कंपनीने मनपाकडे परवानगी मागितलेली आहे अशी माहिती आहे.

तरी 50 कि.मी. लांबीची नंतर 10 कि.मी. लांबीची व त्यानंतर 13 कि.मी. लांबीची OFC केबल टाकण्याकरिता कोणते दर आकारण्यात आले या करिता महासभा किंवा स्थायी समितीची मान्यता घेतलेली आहे किंवा कसे तसेच उक्त नमुद कंपनी समवेत जो कांही करारनामा झाला त्यातील नियम व अटींची अमलबजावणी झाली किंवा होते आहे का, हे पाहण्याची जबाबदारी कोणत्या विभागाची अथवा अधिका-यांची आहे तसेच शहरामध्ये या कंपनीचे जे टॉवर उभे आहेत त्याकरिता त्यांनी मनपाकडे परवानगी मागितलेली होती किंवा कसे याची सविस्तर माहिती सभागृहास देणे करिताचा प्रस्ताव मनपा स्थायी समितीच्या सभागृहासमोर सादर.

**सुचक** :- सय्यद शेर अली. **अनुमोदक** :- मसुद अहेमद खान, अ. लतीफ मजीद

**विषय क्रं. 04** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागामध्ये एकत्रीत वेतनावर 12 पंप ऑपरेटर हे दिनांक 18.08.07 पासुन कार्यरत आहेत त्यांना नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रं. संकीर्ण-2016/प्र.क्र.24/नवि-20 मंत्रालय मुंबई-32 दिनांक 22.01.16 व सहाय्यक कामगार आयुक्त नांदेड यांचे पत्र जा.क्रं. सकाअ/नांदेड/आस्था/2016/1657 दिनांक 17.11.16 रोजी मनपाकेस पाठविण्यात आलेल्या पत्राच्या अनुषंगाने उद्योग उर्जा व कामगार विभाग यांच्या अधिसुचना क्रं. कीवेअ 2014/ 510/प्रक्र.150/कामगार-7 दिनांक 14.02.15 च्या अधिसुचनेतीलनमुद केलेल्या कामगाराच्या वर्गवारी प्रमाणे अनुज्ञेय असलेले किमान वेतन व त्यावर दर सहा महिण्यासाठी अनुज्ञेय असलेला विशेष भत्ता देणे बंधनकारक आहे सदरील 12 पंप ऑपरेटर हे जवळपास 10 वर्षापासुन पंप ऑपरेटर या पदावर काम करीत असल्याने त्यांना किमान वेतन आयोगाप्रमाणे वेतन वाढ देवुन त्यावर दर सहा महिण्यासाठी अनुज्ञेय असलेला विशेष भत्ता अधिसुचनेच्या तारखेपासुन देण्यास ही स्थायी समितीची सभा मान्यता प्रदान करते व हा ठराव याच सभेत कायम करते.

**सुचक** :- प्रशात विठ्ठलराव तिडके **अनुमोदक** :- देशमुख सतीश पुंडलीकराव

**स्वाक्षरीत/-**
**नगसचिव**
**नावाशमनपा नांदेड**

**स्वाक्षरीत/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**नावाशमनपा नांदेड**